**सातव्या वेतन आयोगानुसार दि. १ जानेवारी २०१६ ते दि. ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देण्यास मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र. सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ नोव्हेंबर २०२२.

संदर्भ : १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.०५.०२.२०२१ .
२) शासन पूरकपत्र, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.१२.०७.२०२१ .
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.३४८/सेवा-४, दि.२२.०३.२०२२

**शासन परिपत्रक**

उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीमध्ये जे शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, आणि यापूर्वी सहाव्या वेतन आयोगानुसार मूळ निवृत्तिवेतनावर अंशराशीकरणाचा लाभ घेतलेला आहे, त्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत होणाऱ्या मूळ निवृत्तिवेतनावर सुधारीत अंशराशीकरणाचा लाभ देय करण्यात आलेला आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील शासन पूरकपत्रान्वये आहरण व संवितरण अधिकारी यांना सुधारीत अंशराशीकरणाची प्रकरणे ऑनलाईन सेवार्थ आज्ञावलीमार्फत महालेखापाल कार्यालय, मुंबई व नागपूर यांना पाठविण्याच्या अनुषंगाने सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.२२.०३.२०२२ अन्वये सातव्या वेतन आयोगानुसार दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना सुधारित अंशराशीकरणाचा लाभ देण्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर कार्यपध्दतीनुसार सुधारित अंशराशीकरणाचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास दि.३०.९.२०२२ पर्यंत सादर करणे आवश्यक होते.

३. तथापि अद्यापही दि.०१.०१.२०१६ ते दि.३१.१२.२०१८ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तिवेतनधारकांना सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित अंशराशीकरणाचे लाभ देण्याची कार्यवाही अनेक प्रकरणांमध्ये प्रलंबित असून त्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यास लागणारा कालावधी विचारात घेता सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित न झालेले अंशराशीकरणाचे प्रस्ताव सादर करण्यास दि. ३१.१२.२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर कालावधीमध्ये प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुखांची राहील.

४. ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषित्तर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये आणि कृषि विद्यापीठे यामधील निवृत्तिवेतनधारक यांना वरील परिपत्रक योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधीचे इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

६. सदर परिपत्रकातील तरतुदी अखिल भारतीय सेवेतील निवृत्तिवेतनधारक / राजकीय निवृत्तिवेतनधारक / स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनधारक / शौर्यपदकभत्ता निवृत्तिवेतनधारक / जखम अथवा इजा निवृत्तिवेतनधारक यांना लागू होणार नाहीत.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२२११०७१७३७०२९४०५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAMAKANT SHIVAJIRAO GHATGE

Digitally signed by RAMAKANT SHIVAJIRAO GHATGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=927f16b596a85f3f04b621916641eefd1bb6b4367c467eb0b061a30ce41ba8ec, pseudonym=AD5BA171C660951BA0BF959863A4808251FBFD58, serialNumber=175D8C74402686B296B9A00D70E6C51C0711C360974050D297FD3F96075BFCAE, cn=RAMAKANT SHIVAJIRAO GHATGE
Date: 2022.11.07 17:42:32 +05'30'

**(र.शि.घाटगे)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

६) सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
७) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई,
८) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
१०) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
११) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
१२) सर्व कोषागार अधिकारी,
१३) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
१४) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
१५) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
१६) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
१७) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१८) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ न्याय शाखा) मुंबई,
२०) प्रबंधक, उच्च न्यायालय ( अपील शाखा) मुंबई,
२१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२३) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२४) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद
२५) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२६) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
२७) सचिव, राज्य निवडणूक आयोग,
२८) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,
२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०००३२.
३०) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
३१) सर्व विभागीय आयुक्त,
३२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
३४) संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
३५) संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
३६) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३७) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई,
३८) कुल सचिव, सर्व कृषि व कृषितर विद्यापीठे,
३९) वित्त विभागातील सर्व कार्यासने,
४०) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.